सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५

# मुंबई वखार अधिनियम, १९५९

( दिनांक १६ मे, २००५ पर्यंत सुधारित )

# *Bombay Act No. V*

# THE BOMBAY WAREHOUSES ACT, 1959

*(As modified up to the 16th May 2005)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर यांनी भारतात मुद्रित केले आणि
संचालक, मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी प्रकाशित केले.

२००६

[किंमत : ४.०० रु.]

# मुंबई वखार अधिनियम, १९५९

अनुक्रमणिका

उद्देशिका.

कलमे.

## प्रकरण एक

### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, आणि प्रारंभ.

२. व्याख्या.


## प्रकरण दोन

### वखारीच्या धंद्यास लायसन देणे


३. लायसन घेतल्यावाचून वखारवाल्याचा धंदा चालविण्यास मनाई.

४. लायसनकरिता अर्ज व लायसन देणे.

५. लायसन देण्याबाबतच्या शर्ती.

६. लायसनची मुदत व ते नवीन करून देणे.

७. लायसन देण्याचे किंवा नवीकरण करून देण्याचे नाकारण्याची नोटीस.

८. लायसन केव्हा रद्द करता येईल.

९. लायसन रद्द करण्यापूर्वी द्यावयाची नोटीस व लायसन निलंबित करणे व रद्द करणे.

१०. अपिले व फेरतपासणी.

११. लायसन परत करणे.

१२. लायसनची दुसरी प्रत.


## प्रकरण तीन

### वखारवाल्याची कर्तव्ये


१३. साठविलेल्या मालाची वाजवी काळजी घेणे.

१४. मालाची खराबी किंवा नुकसानी होऊ नये म्हणून पूर्वोपाय योजणे.

१५. मालाची ओळख पटावी म्हणून तो त्याप्रमाणे ठेवणे.

१६. वखारीत खराब होणारा माल व त्याची विल्हेवाट.

१७. माल स्वाधीन करणे.

१८. वखारवाल्यास मालात होणाऱ्या वाढीबद्दल हक्क असणार नाही किंवा तो मालात घट झाल्याबद्दल जबाबदार असणार नाही.

१९. वखारवाल्याने हिशोब, चोपड्या वगैरे ठेवणे.

२०. वखारीतील मालाचा विमा उतरणे.

२१. भेदभाव करण्यास मनाई.

२२. सहकारी संस्था वगैरे खेरीज करून इतर वखारवाल्याने वखारीतील मालावर पैसे कर्जाऊ देता कामा नये.

## प्रकरण चार

### मालाची तपासणी व वर्गीकरण

२३. तपासणी

२४. ज्यास लायसन मिळाले आहे असे मालाचे वजन करणारे, नमुना घेणारे आणि वर्गवारी करणारे.

२५. लायसनची मुदत आणि ते नव्याने करून देणे.

२६. लायसन तहकूब किंवा रद्द करणे.

२७. लायसन परत करणे.

२८. लायसन न मिळालेले वजन करणारे व वर्गवारी करणारे यांस मनाई.

२९. लायसनची दुसरी प्रत.

३०. वजन करण्याच्या, नमुने घेण्याच्या आणि वर्गवारी करण्याच्या सोयी.

## प्रकरण पाच

### वखारीच्या पावत्या

३१. पावत्या देणे.

३२. शेरा लिहून पावती हस्तांतरित करता येईल.

३३. पावत्यांच्या दुसऱ्या प्रती.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

३४. तारणाची रक्कम जप्त होणे व ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करणे.

३५. शास्ती.

३६. लायसन तहकूब किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई मिळणार नाही.

३७. या अधिनियमाशी विसंगत असणारे करार व कबुलायती अवैध असणे.

३८. राज्य सरकारास आपले अधिकार सोपवून देण्याचा अधिकार.

३९. अनुसूचीची सुधारणा करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

४०. अधिनियमाच्या कक्षेतून वखारी वगळण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

४१. नियम.

४२. निरसन व व्यावृत्ती.

४३. समुद्र सीमाशुल्क अधिनियम, १८७८ वगैरे खालील वखारींना अधिनियम लागू नसणे.

अनुसूची.

# सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५[१]

[ मुंबई वखार अधिनियम, १९५९ ]

(२८ जानेवारी १९६०)

## मुंबई राज्यांतील विवक्षित माल वखारीत ठेवण्यासंबंधी नियमन करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यांतील विवक्षित माल वखारीत ठेवण्यासंबंधी नियमन करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक.

संक्षिप्त नाव, व्याप्ती, व प्रारंभ.

**१.** (१) ह्या अधिनियमास मुंबई वखार अधिनियम, १९५९ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण [२][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत जी तारीख नेमील त्या [३] तारखेस अंमलांत येईल.

व्याख्या.

**२.** संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमात—

(अ) " सहकारी संस्था " या संज्ञेचा अर्थ, * मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५ किंवा [४][महाराष्ट्र राज्याच्या] कोणत्याही भागात अंमलात असलेला कोणताही तत्सम विधि याच्या तरतुदीनुसार नोंदलेली किंवा नोंदलेली म्हणून समजण्यांत येणारी संस्था, असा समजावा ;

(ब) " माल ठेवणारा " यां संज्ञेचा अर्थ, वखारीत साठवून ठेवण्याकरिता वखारवाल्यास माल देते ती व्यक्ती असा समजावा ; आणि तीत, अशा मालाबाबत वखारवाल्यानें दिलेली पावती जी वैधरीत्या धारण करते आणि माल ठेवणारी किंवा तिचा वैध हस्तांतरिती हिने दिलेल्या शेऱ्यावरून किंवा केलेल्या हस्तांतरणावरून जीस मालाबाबतचा हक्क प्राप्त होतो अशा व्यक्तीचा समावेश होतो ;

(क) " माल " या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमाच्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या वस्तुंपैकी कोणतीही वस्तू, असा समजावा ;

(ड) " लायसन " म्हणजे कलम ४ अन्वये दिलेले किंवा कलम ६ अन्वये नवीन करून दिलेले लायसन ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र १९५९, भाग सहा, पृष्ठे ७४८-७४९ पहा.

[२] महाराष्ट्र विधि स्वीकृती (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] शासकीय अधिसूचना ए ॲन्ड सी विभाग क्रमांक डब्लूएचअे १५५९/३१८५४/एमएससी, दिनांक २० मार्च, १९६० अन्वये २५ एप्रिल, १९६०.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

[४] महाराष्ट्र विधि स्वीकृती (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(इ) " व्यक्ती " या संज्ञेत, पेढीचा व कोणत्याही कंपनीचा किंवा व्यक्तींच्या समुहाचा किंवा मंडळीचा--मग ती विधि संस्थापित असो किंवा नसो--समावेश होतो ;

(फ) " विहित " म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले ;

(ग) " विहित प्राधिकारी " या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये सोपविलेली कर्तव्ये बजाविण्याकरिता राज्य सरकारने अधिकार दिलेला प्राधिकारी असा समजावा ;

(ह) " पावती " या संज्ञेचा अर्थ, वखारवाल्याने वखारीत माल ठेवणाऱ्या व्यक्तीस विहित नमुन्याप्रमाणे दिलेली वखारीची पावती, असा समजावा ;

(आय) " नियम " म्हणजे या अधिनियमान्वये केलेले किंवा केलेले म्हणून समजण्यांत येणारे नियम ;

(जे) " वखार " या संज्ञेचा अर्थ, माल ठेवणाऱ्यांच्या वतीने माल साठवून ठेवण्यासाठी वापरण्यांत येणारी किंवा वापरता येईल अशी इमारत, बांधकाम अगर इतर संरक्षित केलेली परिवेष्टित जागा, असा समजावा. परंतु तीत उपाहारगृहे, रेल्वेची स्टेशने, इतर सार्वजनिक वाहनांच्या जागा व तत्सम गोष्टीस जोडून असलेल्या प्रसाधन कक्षाचा समावेश होत नाही ;

(के) " वखारवाला " या संज्ञेचा अर्थ, आपला वखारीचा धंदा चालविण्यासाठी ज्या व्यक्तीने या अधिनियमान्वये लायसन मिळविलेले आहे ती व्यक्ती, असा समजावा.

## प्रकरण दोन

### वखारीच्या धंद्यास लायसन देणे.

लायसन घेतल्यावाचून वखारवाल्याचा धंदा चालविण्यास मनाई.

३. कलम ११ च्या तरतुदीस अधीन राहून, या अधिनियमान्वये दिलेल्या लायसनच्या अटी व शर्ती याअन्वये व तद्नुसार असेल ते खेरीज करून कोणत्याही व्यक्तीने लायसन घेतल्यावाचून वखारवाल्याचा धंदा चालविता कामा नये किंवा आपण वखारवाला आहोत असे दर्शविता किंवा भासविता कामा नये.

लायसनकरिता अर्ज व लायसन देणे.

४. (१) लायसन मिळविण्यासाठी करावयाचा अर्ज, विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडे केला पाहिजे.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, विहित केलेल्या प्राधिकाऱ्यास, विहित केलेली फी दिल्यावर, अशा व्यक्तीला आपला धंदा चालविण्यासाठी लायसनच्या अटी व शर्ती व या अधिनियमाचे व त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार लायसन देण्याचा अधिकार आहे.

लायसन देण्याबाबतच्या शर्ती.

५. लायसन देण्यापूर्वी विहित प्राधिकाऱ्याने पुढील बाबतीसंबंधी स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे. त्या बाबी अशा :--

(अ) ज्या वखारींत विशिष्ट प्रकारचा माल साठवून ठेवण्याचे योजिले असेल त्या वखारी, तो माल किंवा तींत साठवून ठेवण्याचा इरादा असलेल्या वर्गाचा किंवा वर्गांचा माल योग्यप्रकारे साठवून ठेवण्यास सोईस्कर आहेत,

(ब) अशा वखारी चालविण्यास अर्जदार लायक आहे,

(क) अर्जदार विहित प्राधिकान्यास विहित करण्यांत येईल असे तारण, विहित करण्यात येईल अशा रीतीने नेईल :

परंतु, अर्जदार हा कृषि उत्पादन (विकास व वखारीत माल ठेवणे याबाबत) कार्पोरेशन, अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन केलेले कॉर्पोरेशन असेल त्या बाबतीत, कोणत्याही तारणाची आवश्यकता असणार नाही.

(ड) राज्य सरकार राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत ज्या कोणत्याही इतर शर्ती निर्दिष्ट करील त्या अर्जदार पूर्ण करील, आणि

(इ) विहित प्राधिकान्याच्या मते अर्जदार लायसन मिळविण्यासाठी अक्षम नसल्याचा समजला जाऊ शकेल असे इतर कोणतेही कारण नाही.

६. कलम ४ अन्वये दिलेले प्रत्येक लायसन, विहित केलेल्या मुदतीपर्यंत अंमलात राहील आणि ते अशी मुदत संपल्यावर वखारवाल्याने त्याबाबत अर्ज केला असता व विहित केलेली फी भरली असता विहित प्राधिकान्यास नवीन करून देता येईल. परंतु कलम ५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या शर्ती पुऱ्या करण्यात येत असल्या पाहिजेत. लायसनची मुदत व ते नवीन करून देणे.

७. जर विहित प्राधिकारी वरील तरतुदींअन्वये देण्याचे किंवा नवीकरण करून देण्याचे नाकारील तर त्याने त्याबद्दलची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत आणि आपल्या आदेशाची एक प्रत अर्जदारास पाठविली पाहिजे. लायसन देण्याचे किंवा नवीकरण करून देण्याचे नाकारण्याची नोटीस.

८. प्रत्येक लायसन हे विहित प्राधिकान्यास, त्याने ते रद्द करण्याच्या आदेशात लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून व विशेषतः पुढील कारणावरून रद्द करता येईल ती कारणे अशी :— लायसन केव्हा रद्द करता येईल.

(अ) वखारवाल्याने आपणास नादार ठरविण्याकरिता अर्ज केला असेल किंवा त्यास नादार ठरविण्यात आले असेल तर ; किंवा

(ब) वखारवाल्याने लायसन दिलेल्या वखारींवरील आपले नियंत्रण सर्वस्वी किंवा अंशतः सोडून दिले असेल तर ; किंवा

(क) वखारवाल्याने अशा वखारी चालविणे बंद केले असेल तर ;

(ड) आपण केलेल्या कामाबद्दल वखारवाल्याने गैरवाजवी आकारणी केली असेल तर ; किंवा

(इ) वखारवाल्याचा धंदा चालविण्यास वखारवाला कोणत्याही प्रकारे अक्षम झाला असेल तर ; किंवा

(फ) वखारवाल्याने लायसनच्या अटींपैकी किंवा शर्तींपैकी कोणत्याही अटीचे किंवा शर्तीचे किंवा हा अधिनियम व तदन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे किंवा राज्य सरकारने राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे कलम ५ अन्वये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही इतर शर्तीचे उल्लंघन केले असेल तर.

लायसने रद्द करण्यापूर्वी द्यावयाची नोटीस व लायसन निलंबित करणे व रद्द करणे.

**९.** (१) लायसन रद्द करण्यापूर्वी विहित प्राधिकाऱ्याने वखारवाल्यास नोटीस दिली पाहिजे. अशा नोटिशीत वखारवाल्यावरील आरोपांचा निर्देश केला पाहिजे व त्यास लायसन का रद्द करण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखविण्यास सांगितले पाहिजे.

(२) वखारवाल्याने खुलासा दिला असल्यास त्याचा विचार केल्यानंतर विहित प्राधिकाऱ्यास लायसन रद्द करण्याचा किंवा त्यास योग्य वाटेल असे आदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलमे (१) व (२) यात उल्लेख केलेल्या चौकशीचा निकाल लागेपर्यंत विहित प्राधिकाऱ्यास वखारवाल्याचे लायसन निलंबित करण्याचा अधिकार आहे.

(४) जर कोणतेहि लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात येईल तर, विहित प्राधिकाऱ्याने लायसनमध्ये त्या अर्थाची नोंद केली पाहिजे.

अपील व फेरतपासणी.

**१०.** (१) वखारवाल्यास लायसन देण्याचे किंवा त्याचे लायसन नवीन करून देण्याचे नाकारणाऱ्या किंवा त्याचे कोणतेही लायसन निलंबित किंवा रद्द करणाऱ्या विहित प्राधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध करावयाचे अपील अशा आदेशाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत सहकारी संस्थांच्या निबंधकाकडे केले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये अपील आल्यावर त्यावर निबंधकाकडे वखारवाल्यास व विहित प्राधिकाऱ्यास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर त्यास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.

(३) राज्य सरकारास लायसन निलंबित किंवा रद्द करण्यासंबंधी किंवा लायसन नवीन करून देण्याचे नाकारण्यासंबंधी विहित प्राधिकाऱ्यापुढे किंवा निबंधकापुढे चालू असलेल्या कोणत्याही कामात दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या अचूकतेविषयी, वैधतेविषयी किंवा औचित्याविषयी तसेच असे काम यथानियम होते किंवा कसे याविषयी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी अशा कामाचे कागदपत्र कोणत्याही वेळी मागविण्याचा व त्यांची तपासणी करण्याचा अधिकार आहे ; व तसेच त्यास असा आदेश रद्द करण्याचा, फिरविण्याचा, त्यात फेरफार करण्याचा किंवा तो कायम करण्याचा किंवा त्यास योग्य वाटेल असे इतर आदेश देण्याचा अधिकार आहे.

(४) कलम ९ अन्वये विहित प्राधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश हा, या कलमात तरतूद केलेल्या अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन राहून आणि निबंधकाने अपिलात दिलेला प्रत्येक आदेश हा, अशा फेरतपासणीस अधीन राहून अंतिम असेल. तसेच राज्य सरकारने फेरतपासणीत दिलेला प्रत्येक आदेश हा अंतिम असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

लायसन परत करणे.

**११.** (१) एखादे लायसन निलंबित करण्यात येईल त्या मुदतीत, वखारवाल्याने वखारवाला म्हणून आपला धंदा चालविता कामा नये ; आणि जेव्हा एखाद्या लायसनची मुदत संपली असेल आणि ते नवीन करण्यात आले नसेल किंवा ते रद्द करण्यात आले असेल तेव्हा, वखारवाल्याने वखारवाला म्हणून आपला धंदा चालविण्याचे बंद केले पाहिजे आणि विहित प्राधिकाऱ्याकडे आपले लायसन परत केले पाहिजे.

(२) जेव्हा, लायसनची मुदत संपली असेल आणि ते नवीन करण्यात आले नसेल किंवा ते रद्द करण्यात आले असेल तेव्हा, विहित प्राधिकाऱ्याने आपल्या मते योग्य इतकी वाजवी मुदत त्यानंतर वखारवाल्यास आपला धंदा आटोपून बंद करण्याकरिता दिली पाहिजे ; आणि कलम ३ मध्ये काहीही.

असले तरी, अशा मुदतीत वखारवाल्यास वखारवाला म्हणून आपला धंदा चालविता येईल व असा धंदा आटोपून बंद करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करता येतील.

**१२.** वखारवाल्यास दिलेले लायसन गहाळ किंवा नष्ट होईल, फाटेल, खराब होईल किंवा अन्यथा वाचता न येण्यासारखे होईल तेव्हा, विहित प्राधिकाऱ्यास वखारवाल्याने त्याबाबत अर्ज केल्यावर व विहित केलेली फी भरल्यावर अशा लायसनची दुसरी प्रत देण्याचा अधिकार आहे. लायसनची दुसरी प्रत.

## प्रकरण ३

## वखारवाल्याची कर्तव्ये

**१३.** सर्वसाधारण विचारी माणूस सारख्याच परिस्थितीत आपल्या स्वतःच्या मालाची जेवढी काळजी घेईल तेवढी काळजी प्रत्येक वखारवाल्याने त्याच्या ताब्यात असलेल्या मालाची घेतली पाहिजे. साठविलेल्या मालाची वाजवी काळजी घेणे.

**१४.** (१) प्रत्येक वखारवाल्याने आपली वखार स्वच्छ व ओल येणार नाही अशा स्थितीत ठेवली पाहिजे उंदीर आणि इतर उपद्रवी प्राणी यांच्याविरुद्ध आवश्यक असतील ते सर्व पूर्वोपाय योजिले पाहिजेत, तसेच त्याने या बाबतीत विहित करण्यात येतील त्या इतर शर्ती पूर्ण केल्या पाहिजेत. मालाची खराबी किंवा नुकसानी होऊ नये म्हणून पूर्वोपाय योजणे.

(२) कोणत्याही वखारवाल्याने, किडे किंवा उपद्रवी प्राणी यांनी दूषित केलेला किंवा खराब केलेला व ज्यामुळे वखारीत ठेवलेल्या किंवा ठेवण्यात येणाऱ्या इतर मालाची खराबी होण्याचा संभव आहे असा माल आपल्या वखारीत साठवून ठेवण्याकरिता स्वीकारता कामा नये.

**१५.** प्रत्येक वखारवाल्याने माल ठेवणाऱ्या एका व्यक्तीचा माल, माल ठेवणाऱ्या इतर व्यक्तींच्या मालापासून आणि ज्या संबंधाने त्याचा माल ठेवणाऱ्यास वेगळी पावती देण्यात आली आहे अशा त्याच्या इतर मालापासून आपल्या वखारीत इतका दूर ठेवला पाहिजे की कोणत्याही वेळी ठेवलेल्या मालाची ओळख पटणे व तो स्वाधीन करणे सहज शक्य होईल : मालाची ओळख पटावी म्हणून तो त्याप्रमाणे ठेवणे.

परंतु, जेव्हा प्रमाणित व प्रत लावलेला माल, वखारवाला व माल ठेवणारा यांच्या दरम्यान केलेल्या कोणत्याही कबुलायतीस अधीन ठेवून, वखारीत साठवून ठेवण्यात येईल तेव्हा, वखारवाल्यास वेगवेगळ्या माल ठेवणाऱ्याचा एकाच प्रकारचा माल एकत्र मिसळता येईल व प्रत्येक माल ठेवणाऱ्यास त्याच्या पावतीत दर्शविल्याप्रमाणे, यथास्थिति वजनाप्रमाणे अगर परिमाणाप्रमाणे अशा मालातील त्याचा भाग मिळण्याचा हक्क असेल.

**१६.** (१) जेव्हा जेव्हा, वखारवाल्याच्या आवाक्याबाहेरील कारणामुळे, वखारीत साठवून ठेवलेला माल खराब होत असेल अगर खराब होण्याच्या परिस्थितीत असेल तेव्हा तेव्हा, वखारवाल्याने, अशी खराबी होत असल्याविषयीची नोटीस माल ठेवणाऱ्यास ताबडतोब दिली पाहिजे व त्या नोटिशीद्वारे, जबाबदारीतून योग्य रीतीने मुक्त केल्याबद्दलचा शेरा लिहून (अशा मालाविषयीची) पावती परत करून व देणे असलेल्या सर्व रकमा देऊन माल ताबडतोब ताब्यात घेण्याबद्दल त्यास कळविले पाहिजे. जर माल ठेवणाऱ्याने वाजवी मुदतीत नोटिशीचे पालन केले नाही, तर वखारवाल्यास, असा माल आपल्या वखारीतून काढून तो जाहीर लिलावाने माल ठेवणाऱ्याच्या खर्चाने व जोखमीवर विकून टाकण्याचा अधिकार आहे. वखारीत खराब होणारा माल व त्याची विल्हेवाट.

(२) वखारीत साठवून ठेवलेल्या कोणत्याही मालात किंवा अशा मालाच्या पावतीत ज्याचा हितसंबंध आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, अशा गोष्टीची व अशा मालातील आपल्या हितसबंधाच्या स्वरुपाची वखारवाल्यास लेखी कळवण्याचा अधिकार आहे ; व वखारवाल्याने ती गोष्ट नमूद करून ठेवली पाहिजे. अशी व्यक्ती मालाच्या स्थितीसंबंधी आपणास कळविण्यात यावे अशी लेखी विनंती करील व असे कळविण्याबद्दलचा खर्च देण्याचे कबूल करील तर, वखारवाल्याने अशा व्यक्तीस त्याप्रमाणे कळविले पाहिजे.

[1][" (३) एखाद्या वखारीत ठेवलेला माल ताब्यात घेण्याच्या वेळी जर माल ठेवणाऱ्यास, तपासणी केल्यावर, माल हरवला आहे किंवा त्यांचे नुकसान झाले आहे असे आढळून आले तर तो वखारवाल्याला अशा तपासणीपासून ७२ तासांच्या आत व वखारीतून माल ताब्यात घेण्यापूर्वी लेखी नोटीस देईल. त्या नोटीशीत त्या वखारीत ठेवलेल्या मालाचा तपशील, माल ठेवणाऱ्यास पोट-कलम (१) अन्वये कोणतीही नोटीस देवून माल ताबडतोब ताब्यात घेण्यास सांगण्यात आले होते किंवा कसे, अशा नोटीशीच्या अनुषंगाने माल ठेवणाऱ्याने माल ताब्यात घेतला होता किंवा कसे आणि ज्या वेळेत माल ताब्यात घेतला ती वेळ, ज्या दिनांकास मालाची तपासणी केली तो दिनांक व वेळ व माल हरवणे किंवा त्याचे नुकसान याबाबतचा तपशील दिलेला असेल. या कलमात तरतूद केलेल्या वेळेत माल ठेवणाराने माल हरवल्याची किंवा त्यांच्या नुकसानीची नोटीस दिली नसल्यास महामंडळाच्या किंवा वखारवाल्याच्या विरुद्ध केलेला कोणताही दावा विधिग्राह्य असणार नाही."]

माल स्वाधीन करणे.

**१७.** प्रत्येक वखारवाल्याने वाजवी अगर वैध कारण नसतांना माल ठेवणाऱ्याने मागणी करताच आणि वखारीची पावती योग्य रीतीने परत केल्यावर व वखारवाल्यास देणे असलेली सर्व रक्कम दिल्यावर आपल्या वखारीत साठवून ठेवलेला माल, निष्कारण विलंब न लावता, त्याच्या स्वाधीन केला पाहिजे. वखारवाला व माल ठेवणारा यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही कबुलायतीस अधीन राहून माल ठेवणाऱ्यास वखारीत ठेवलेला माल अंशतः ताब्यात घेण्याचा अधिकार आहे.

वखारवाल्यास मालात होणाऱ्या वाढीबद्दल हक्क असणार नाही किंवा तो मालात घट झाल्याबद्दल जबाबदार असणार नाही.

**१८.** (१) वखारीत साठवून ठेविलेल्या मालात ओल शोषून घेतल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे कोणत्याही प्रकारची वाढ झाली असेल तर त्यावर वखारवाल्यास हक्क सांगता येणार नाही.

(२) जर वखारवाल्याच्या आवाक्याबाहेरील कोणत्याही कारणामुळे अशा मालात वाळल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे घट आली असेल तर वखारवाला त्याबद्दल जबाबदार असणार नाही.

(३) कोणतीही अशी वाढ किंवा घट ही ओल शोषून घेतल्यामुळे किंवा वाळल्यामुळे झाली किंवा वखारवाल्याच्या आवाक्याबाहेरील इतर कारणामुळे झाली याबाबत कोणताही वाद निर्माण झाला असेल तर अशा प्रसंगी ती बाब सहकारी संस्थांच्या निबंधकाकडे किंवा याबाबतीत राज्य सरकार नियुक्त करील अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे लिहून पाठविण्यात आली पाहिजे आणि निबंधकाचा किंवा इतर अधिकाऱ्याचा निर्णय अखेरचा असेल.

वखारवाल्याने हिशेब, चोपड्या इत्यादी ठेवणे.

**१९.** प्रत्येक वखारवाल्याने विहित करण्यांत येईल त्या नमुन्यांत आणि त्या रीतीने विहित करण्यांत येतील ते हिशेब, चोपड्या व कागदपत्र ठेवले पाहिजेत.

वखारीतील मालाचा विमा उतरविणे.

**२०.** (१) प्रत्येक वखारवाल्याने आपल्या वखारीत साठवून ठेवलेल्या मालाची आगीमुळे, किंवा चोरीमुळे होणारी नुकसानी किंवा खराबी याबद्धल विहित करण्यात येईल त्या रीतीने विमा उतरवला पाहिजे. माल ठेवणाऱ्याने लेखी स्वरुपात विनंती केल्यावर आणि जादा विम्याबद्दल आवश्यक तो खर्च देण्यास तो कबूल झाल्यावर, वखारवाल्यास, अशा मालाची पुरामुळे, दंग्यामुळे किंवा अंतस्थ

[1]सन १९७५ चा मुंबई वखार (सुधारणा) अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. अधि. क्र. ७१) अन्वये पोटकलम (३) समाविष्ट करण्यात आले.

प्रक्षोभामुळे किंवा इतर कोणत्याही आकस्मिक प्रसंगामुळे होणारी नुकसानी किंवा खराबी याबद्दल सुद्धा विमा उतरवण्याचा अधिकार आहे

(२) प्रत्येक वखारवाल्यास माल ठेवणाऱ्याचा माल त्याच्या स्वाधीन करण्यापूर्वी त्याच्या मालाच्या बाबतीत, जर विमा उतरवणे बंधनकारक असेल तर विहित केलेल्या दराने किंवा जर विमा उतरविणे हे ऐच्छिक असेल तर कबूल केलेल्या दराने, जो विम्याचा आकार बसत असेल तो वसूल करण्याचा हक्क असेल आणि अशा आकाराबद्दल मालावर त्याचा धारणाधिकार असेल.

भेदभाव करण्यास मनाई.

**२१.** आपल्या वखारीच्या सोईचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीत कोणताही भेदभाव न करता प्रत्येक वखारवाल्याने, जो माल धंद्याच्या सामान्य व नित्यक्रमात नेहमीच्या पद्धतीने साठविण्यासाठी त्याजकडे योग्य स्थितीत देण्यात आला असेल व अशा वखारीत त्याच्याकडून रिवाजानुसार साठविण्यात येत असेल अशा प्रकारचा कोणताही माल वखारीत मावेल इतक्या प्रमाणात आपल्या वखारीत साठविण्यासाठी स्वीकारला पाहिजे :

परंतु, विहित करण्यात येतील अशा सवलती सहकारी संस्थांना देण्याचा वखारवाल्यास अधिकार आहे.

सहकारी संस्था वगैरे खेरीजकरून इतर वखारवाल्याने वखारीतील मालावर पैसे कर्जाऊ देता कामा नये.

**२२.** कोणत्याही विधित कांहीही अंतर्भूत असले तरी, सहकारी संस्थेखेरीज किंवा कृषि उत्पादन (विकास व वखारीत माल ठेवणे याबाबत) कॉर्पोरेशन अधिनियम, १९५६ अन्वये स्थापन केलेल्या कॉर्पोरेशनाखेरीज इतर कोणत्याही वखारवाल्याने, आपल्या स्वतःच्या खात्यावर किंवा इतरांच्या खात्यावर, आपल्या वखारीत साठविण्यासाठी स्वीकारलेल्या मालाच्या संबंधात व्यवहार करता कामा नये किंवा त्या मालावर पैसा कर्जाऊ देता कामा नये.

## प्रकरण ४.

## मालाची तपासणी व वर्गीकरण

तपासणी.

**२३.** हा अधिनियम व तदअन्वये केलेले नियम यांत तरतूद केलेल्या आवश्यक गोष्टींचे योग्य रीतीने पालन करण्यात आले आहे की नाही याबद्दल आपली खात्री करून घेण्यासाठी कामाच्या वेळात कोणत्याही वेळी, जिच्या संबंधात लायसन मंजूर करण्यात आले असेल ती कोणतीही वखार, तिच्यातील यंत्रसामग्री किंवा उपकरण, तिच्यात साठविलेला माल आणि त्या संबंधातील हिशेबाच्या वह्या व कागदपत्रे यांची पाहणी करण्याचा किंवा करविण्याचा, किंवा ते तपासण्याचा किंवा त्यांची तपासणी करविण्याचा विहित प्राधिकाऱ्यास अधिकार आहे.

ज्यास लायसन मिळाले आहे असे मालाचे वजन करणारे, नमुना घेणारे आणि वर्गवारी करणारे.

**२४.** (१) विहित केलेल्या रीतीने विहित प्राधिकाऱ्याकडे अर्ज केल्यावर आणि विहित केलेली फी दिल्यावर, विहित प्राधिकाऱ्यास विहित केलेली पात्रता असणाऱ्या व्यक्तीस लायसन देण्याचा अधिकार आहे. असे लायसन मिळाल्यामुळे अशा व्यक्तीस वखारीत जो कोणताही माल साठविण्यात आला असेल किंवा येईल त्या मालाचे वजन करणारे, त्याचा नमुना घेणारे व त्याची वर्गवारी करणारे म्हणून काम करण्याचा व त्यांनी तपासलेल्या मालाचे वजन, आकारमान, प्रत किंवा दर्जा यांविषयी प्रमाणपत्र देण्याचा हक्क मिळेल.

(२) वखारीत साठविलेल्या मालाचे वजन, प्रत किंवा दर्जा याविषयी वजन करणारे, नमुना घेणारे व वर्गवारी करणारे यांनी दिलेली प्रमाणपत्रे, वखारवाला व माल ठेवणारा यांपैकी कोणीही लवाद मंडळाकडे केलेल्या अपिलातील कोणत्याही आदेशास अधीन ठेवून, वखारवाला व माल ठेवणारा यावर बंधनकारक असतील.

(३) वखारीत साठविलेल्या मालाचे वजन, प्रत किंवा दर्जा यासंबंधी वजन करणारे, नमुना घेणारे व वर्गवारी करणारे किंवा वखारवाला यांजविरुद्ध असलेल्या तक्रारीचा निर्णय करण्यासाठी लवाद मंडळाची नेमणूक करण्याचा विहित प्राधिकाऱ्यास अधिकार आहे. लवाद मंडळाचा निर्णय अखेरचा असेल व कोणत्याही न्यायालयांत त्यावर आक्षेप घेता येणार नाही.

लायसनची मुदत आणि ते नव्याने करून देणे.

२५. मालाचे वजन करणारा, मालाचा नमुना घेणारा किंवा त्याची वर्गवारी करणारा यास कलम २४ अन्वये दिलेले प्रत्येक लायसन हे विहित केलेल्या मुदतीसाठीच वैध राहील आणि अशी मुदत संपल्यानंतर, त्या बाबतीत अर्ज करून विहित केलेली फी दिल्यावर विहित प्राधिकाऱ्यास, वेळोवेळी, ते आणखी मुदतीसाठी नव्याने करून देता येईल.

लायसन निलंबित किंवा रद्द करणे.

२६. याबाबत केलेल्या नियमास अधीन राहून, वजन करणारा, नमुने घेणारा किंवा वर्गवारी करणारा यास दिलेले प्रत्येक लायसन, विहित प्राधिकाऱ्याकडून, लेखी नमूद करून ठेवावयाच्या पुरेशा कारणांसाठी, निलंबित किंवा रद्द केले जाण्यास पात्र असेल. लायसन रद्द करण्यापूर्वी, विहित प्राधिकाऱ्याने, ज्या कारणांवरून अशी उपाययोजना करण्याचे योजिले आहे ती कारणे लायसन धारण करणाऱ्या व्यक्तीस कळविली पाहिजेत आणि अशी उपाययोजना का करण्यात येऊ नये याविषयी कारण दर्शविण्याची त्यास योग्य संधी दिली पाहिजे.

लायसन परत करणे.

२७. वजन करणारा, नमुने घेणारा किंवा वर्गवारी करणारा यास दिलेल्या लायसनची मुदत संपेल किंवा ते रद्द करण्यात येईल तेव्हा त्याने ते विहित प्राधिकाऱ्यास परत केले पाहिजे.

लायसन न मिळालेले, वजन करणारे व वर्गवारी करणारे यांस मनाई.

२८. या विभागान्वये ज्यास लायसन देण्यात आलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीस वजन करणारी, नमुने घेणारी किंवा वर्गवारी करणारी म्हणून काम करतो किंवा आपण तसे आहोत असे भासविता कामा नये.

लायसनची दुसरी प्रत.

२९. वजन करणाऱ्या, नमुने घेणाऱ्या किंवा वर्गवारी करणाऱ्या व्यक्तीस दिलेले लायसन गहाळ झाले असेल, नष्ट झाले असेल, फाटले असेल, खराब झाले असेल किंवा अन्यथा वाचता न येण्याजोगे झाले असेल तर, यथास्थिति, वजन करणाऱ्या, नमुने घेणाऱ्या किंवा वर्गवारी करणाऱ्या व्यक्तीने त्याबाबत अर्ज केल्यावर व विहित केलेली फी दिल्यावर त्यात विहित प्राधिकाऱ्याने त्या लायसनची दुसरी प्रत दिली पाहिजे.

वजन करण्याच्या, नमुने घेण्याच्या आणि वर्गवारी करण्याच्या सोयी.

३०. प्रत्येक वखारवाल्याने आपल्या वखारीत साठविलेल्या कोणत्याही मालाचे वजन करण्यासाठी, नमुने घेण्यासाठी आणि त्याची वर्गवारी करण्यासाठी वाजवी सोयींची तरतूद केली पाहिजे.

## प्रकरण ५.

## वखारीच्या पावत्या

पावत्या देणे.

३१. वखारवाला वखारीत ठेवण्यासाठी माल स्वीकारील त्यावेळी, त्याने त्याबद्दल पावती दिली पाहिजे. अशी पावती विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे असली पाहिजे व तिच्यात प्रत्येक माल ठेवणारा त्याच्या वखारीत जो माल ठेवील त्यासंबंधी पूर्ण तपशील असला पाहिजे.

शेरा लिहून पावती हस्तांतरित करता येईल.

**३२.** वखारवाल्याने दिलेली पावती ही, तिच्यात अन्यथा निर्दिष्ट करण्यात आले नसल्यास, शेरा लिहून हस्तांतरित करता येईल आणि तिच्यात निर्दिष्ट केलेला माल ज्या व्यक्तीने तो प्रथम ठेवला होता त्या व्यक्तीस ज्या अटींवर व शर्तींवर तो मिळण्याचा हक्क असेल त्याच अटींवर व शर्तीवर तो मिळण्याचा हक्क वैधरीत्या पावती धारण करणाऱ्या व्यक्तीस असेल.

पावत्यांच्या दुसऱ्या प्रती.

**३३.** पावती हरवली, नष्ट झाली, फाटली, खराब झाली किंवा अन्यथा वाचता न येण्याजोगी झाली तर, माल ठेवणाऱ्याने त्या बाबतीत अर्ज केल्यावर व विहित केलेली (कोणतीही असल्यास) फी दिल्यावर वखारवाल्याने त्याला त्या पावतीची दुसरी प्रत दिली पाहिजे. पावत्यांच्या दुसऱ्या प्रती या कारणांकरिता विहित केलेल्या नियमांन्वयेच्या अटींपैकी त्यास लादणे योग्य वाटतील अशा अटींवर दिल्या पाहिजेत.

## प्रकरण ६.

## संकीर्ण

तारणाची रक्कम जप्त होणे व ती जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करणे.

**३४.** (१) जर वखारवाला आपल्या लायसनच्या शर्ती किंवा अटी यापैकी कोणत्याही शर्तीचे किंवा अटीचे किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात कसूर करील किंवा त्याचे उल्लंघन करील तर, ज्या कोणत्याही अन्य शास्तीस तो पात्र असेल त्या शास्तीस बाध न येता, या अधिनियमाच्या उपबंधान्वये त्याने करून दिलेल्या मुचलक्यानुसार (बॉन्ड) त्याने ठेवलेल्या तारणाची रक्कम जप्त केली जाण्यास पात्र असेल आणि अशी मुचलक्यानुसार येणे असलेली रक्कम, त्याच्याकडून किंवा त्याच्या जामिनांकडून किंवा त्याच्या वारसांकडून किंवा वैध प्रतिनिधीकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

(२) राज्य शासनास, अशा रीतीने जप्त केलेल्या किंवा वसूल केलेल्या रकमेतून वखारवाल्याने या अधिनियमाची कोणतीही तरतूद पाळण्याची कसूर केल्यामुळे किंवा त्याचे उल्लंघन करून वर्तन केल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे नुकसान झाले असेल त्यास पैसे देण्याचा अधिकार आहे.

शास्ति.

**३५.** (१) जो कोणी या अधिनियमाची कोणतीही तरतूद पाळण्यात कसूर करील किंवा त्याचे उल्लंघन होईल असे कृत्य करील, त्याने या अधिनियमान्वये अपराध केला आहे असे समजले जाईल व तो दोषी ठरविण्यात आला असता—

(अ) कलम ३ किंवा २२ च्या तरतुदीचे उल्लंघन होईल त्या बाबतीत, पराकाष्ठा सहा महिन्यांच्या साध्या कैदेच्या शिक्षेस किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्हीही शिक्षांस पात्र होईल ;

(ब) कोणत्याही इतर बाबतीत, पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(२) या अधिनियमान्वये अपराध करणारी व्यक्ती कंपनी असेल तर, अपराध घडल्याच्या वेळी कंपनी स्वाधीन असणारा व कंपनीचा धंदा चालविण्याबद्दल कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती व त्याचप्रमाणे कंपनी ही अपराधाबद्दल दोषी आहेत असे समजण्यात आले पाहिजे आणि त्यांजविरुद्ध वैध कार्यवाही केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा केली जाण्यास ती पात्र असतील :

परंतु, जर अशी कोणतीही व्यक्ती असे सिद्ध करील की, उक्त अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती, तर त्या पोट-कलमांतील कोणत्याही मजकुरामुळे ह्या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस ती पात्र होणार नाही.

(३) पोट-कलम (२) मध्ये कांहीही असले तरी, त्या अधिनियमान्वयाचा अपराध कंपनीने केला असेल आणि उक्त अपराध कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, चिटणिसाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे घडला असे सिद्ध करण्यात आले असेल त्या बाबतीत असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी हाही त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे समजण्यात आले पाहिजे आणि त्याच्या विरुद्ध वैध कार्यवाही चालविली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा केली जाण्यास तो पात्र असेल.

**स्पष्टीकरण १.**—पोट-कलमे (२) व (३) यांच्या प्रयोजनांकरितां,—

(अ) " कंपनी " या संज्ञेचा अर्थ, कोणतीही संस्थापित मंडळी असा समजावा आणि त्या संज्ञेत पेढीचा किंवा व्यक्तींच्या इतर संस्थेचा समावेश होतो ; आणि

(ब) पेढीच्या संबंधांत " संचालक " या संज्ञेचा अर्थ, पेढीतील भागीदार असा समजावा.

**स्पष्टीकरण २.**—पोट-कलम (२) चे उपबंध जेथवर ते अपराध घडल्याच्या वेळी कंपनी स्वाधीन असणाऱ्या किंवा तिचा धंदा चालविण्याबद्दल कंपनीस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींना लागू असतील तेथवर, कृषि-उत्पादन (विकास व वखारीत माल ठेवणे) कॉर्पोरेशन अधिनियम, १९५६ याअन्वये स्थापन केलेले कॉर्पोरेशन स्वाधीन असणाऱ्या किंवा त्या कॉर्पोरेशनला जबाबदार असणाऱ्या अशा कोणत्याही व्यक्तींना लागू असणार नाहीत.

लायसन निलंबित किंवा रद्द केल्याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई मिळणार नाही.

**३६.** जेव्हा या अधिनियमान्वये कोणतेही लायसन निलंबित किंवा रद्द करण्यात येईल तेव्हा, कोणत्याही व्यक्तीस नुकसानभरपाई मिळण्याचा किंवा त्याबाबत दिलेली कोणतीही फी परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

या अधिनियमाशी विसंगत असणारे करार व कबुलायती अवैध असणे.

**३७.** या अधिनियमाच्या तरतुदींशी, किंवा तद्नुसार केलेल्या नियमांशी विसंगत असणारा प्रत्येक करार किंवा कबुलायत, ज्या मर्यादेपर्यंत विसंगत असेल त्या मर्यादेपर्यंत, अवैध असेल.

राज्य सरकारास आपले अधिकार सोपवून देण्याचा अधिकार.

**३८.** राज्य सरकारास, या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार त्यास मिळालेल्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार आपल्या अधीन असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे सोपविण्याचा अधिकार आहे.

अनुसूचीची सुधारणा करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**३९.** राज्य सरकारास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अनुसूचीतील नोंदीपैकी कोणत्याही नोंदीत जादा मजकूर घालण्याचा, कोणत्याही नोंदीची सुधारणा करण्याचा किंवा अशी कोणतीही नोंद वगळण्याचा अधिकार आहे.

अधिनियमाच्या कक्षेतून वखारी वगळण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**४०.** राज्य सरकारास, राजपत्रांतील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदीपैकी सर्व किंवा कोणत्याही तरतुदीच्या कक्षेतून वखारीच्या कोणत्याही वर्गास वगळण्याचा अधिकार आहे.

**४१.** (१) राज्य सरकाराला, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषकरून परंतु वरील तरतुदीच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढील गोष्टींबाबत तरतूद करण्याचा अधिकार आहे :—

(एक) या अधिनियमान्वये सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्याकरिता अधिकार दिलेला प्राधिकारी ;

(दोन) कलम २, खंड (ह) अन्वये द्यावयाच्या पावतीचा नमुना ;

(तीन) कलम ४ अन्वये लायसन मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, कलम ६ अन्वये लायसन नवीन करून घेण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, व कलम १२ अन्वये लायसनची दुसरी प्रत मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना ;

(चार) कलम ३ अन्वये वखारवाल्याचा धंदा लायसनच्या ज्या शर्तींनुसार आणि अटींनुसार चालविला गेला पाहिजे त्या लायसनच्या शर्ती आणि अटी, कलम ४, पोट-कलम (२) अन्वये लायसन मिळविण्यासाठी द्यावयाची फी आणि कलम ६ अन्वये ज्या मुदतीपर्यंत लायसन वैध राहील ती मुदत ;

(पाच) कलम ५, खंड (क) अन्वये द्यावयाच्या तारणाची रक्कम व ती ज्या रीतीने द्यावयाची ती रीत (यांत मुचलक्याच्या नमुन्याचा समावेश होतो) ;

(सहा) कलम ६ अन्वयें लायसन नवीन करून देण्याबद्दलची फी व कलम १२ अन्वये त्याची दुसरी प्रत देण्याबद्दलची फी ;

(सात) ज्या शर्तीवर किंवा शर्तीनुसार लायसनची दुसरी प्रत देता येईल त्या शर्ती ;

(आठ) कलम १४, पोट-कलम (१) अन्वये वखारवाल्याने ज्या अटींचे पालन केले पाहिजे त्या (यांत वखार आणि त्यात साठवून ठेवलेला माल निर्जन्तुक करण्याच्या क्रियेचा समावेश होतो) अटी ;

(नऊ) कलम १९ अन्वये ठेवावयाच्या व सुस्थितीत राखावयाच्या चोपड्या, हिशोब व कागदपत्रे ;

(दहा) कलम २०, पोट-कलम (१) अन्वये ज्या रीतीने वखारीत ठेवलेल्या मालाचा विमा उतरला पाहिजे ती रीत ;

(अकरा) कलम २०, पोट-कलम (२) अन्वये ज्या दराने विम्याचा आकार वसूल करता येईल ते दर ;

(बारा) वखारवाल्यास, कलम २१ अन्वये सहकारी संस्थेस ज्या सवलती देता येतील त्या सवलती ;

(तेरा) वजन करणारे, नमुना घेणारे व वर्गवारी करणारे यांच्या पात्रता व त्यांना लायसन देणे, लायसनसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, त्यांनी त्याबाबत द्यावयाची फी, ज्या शर्तीवर व ज्या मुदतीपुरते त्यांना लायसन द्यावयाचे त्या शर्ती व ती मुदत त्यांनी द्यावयाच्या प्रमाणपत्रांचा नमुना, त्यांची लायसन नवीन करून देणे, ज्या शर्तीवर लायसनच्या दुसऱ्या प्रती देता येतील

त्या शर्ती, आणि कलम २६ च्या प्रयोजनांकरिता ज्या शर्तीवर लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल त्या शर्ती ;

(चौदा) कलम ३३ अन्वये पावतीच्या दुसऱ्या प्रतीबद्दल द्यावयाची फी आणि अशी पावती ज्या शर्तीवर देता येईल त्या शर्ती ;

(पंधरा) लायसन दिल्याचे, निलंबित व रद्द केल्याचे प्रसिद्ध करणे, तसेच वखारवाले व त्यांच्या वखारी यांची यादी प्रसिद्ध करणे ;

(सोळा) वखारवाल्याने आपल्या वखारीत माल ठेवण्याबद्दल घ्यावयाचे आकार ;

(सतरा) या अधिनियमान्वये ज्या रीतीने नोटिसा दिल्या पाहिजेत ती रीत ;

(अठरा) वखारीमध्ये खराब होत असलेला किंवा खराब होण्याच्या स्थितीत आलेला माल विकण्याकरिता करावयाच्या जाहीर लिलावाची रीत आणि वखारवाल्याने अशी विक्रीच्या पैशांचा हिशोब देण्याची रीत ;

(एकोणीस) वखारवाल्याने साठविलेल्या मालाचे वर्गीकरण ;

(वीस) वखारीत वापरावयाची प्रमाण वजने, मापे आणि मालाचे वर्गीकरण ;

(एकवीस) लवाद मंडळापुढे चालवावयाच्या कामात अनुसरावयाची कार्यपद्धती आणि त्याने दिलेल्या निवाड्यांच्या अंमलबजावणीची रीत ;

(बावीस) वखारवाल्याचे कामकाज सर्वसाधारणपणे कार्यक्षम रीतीने चालविण्यासाठी ;

(तेवीस) विहित करावयाची किंवा करण्यात येईल ती कोणतीही अन्य बाब.

(३) या कलमान्वये कोणताही नियम करतांना, त्या नियमांचे उल्लंघन करणारी व्यक्ती ही पराकाष्ठा शंभर रुपयांच्या दंडास पात्र असेल अशी तरतूद करण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

(४) या कलमान्वये नियम करण्याचा अधिकार, ते राजपत्रांत आगाऊ प्रसिद्ध केले पाहिजेत या अटीस अधीन असेल.

(५) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवले पाहिजेत. आणि ते, ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले त्या किंवा त्याच्या लगतपुढील अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील त्या फेरफारांना अधीन असतील.

निरसन व व्यावृत्ति. **४२.** हा अधिनियम अंमलात आल्यावर पुढील विधि रद्द होतील :—

(अ) मुंबई वखार अधिनियम, १९४७ ; १९४७ चा मुंबई ६१.

१३५८ फसलीचा हैद्राबाद नोंदणी क्रमांक ४६.

(ब) १३५८ फसलीचा हैदराबाद वखार विनियम ;

१९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधि. क्र. १.

(क) मध्यप्रांत आणि वऱ्हाड शेतकी वखार अधिनियम, १९४७ ; आणि

१९५६ चा सौराष्ट्र अधि. क्र. १४.

(ड) सौराष्ट्र वखार अधिनियम, १९५६.

परंतु, हे अधिनियम अशा रीतीने रद्द झाल्यामुळे पुढील बाबीस बाध येणार नाही :—

(अ) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधीचा पूर्वीचा अंमल किंवा त्यानुसार योग्य रीतीने केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट ;

(ब) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधिनुसार संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क, किंवा विशेष अधिकार किंवा पत्करलेले बंधन किंवा जबाबदारी ;

(क) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधिविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधांच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ति, केलेली जप्ती किंवा शिक्षा ; किंवा

(ड) पूर्वोक्त असा कोणताही हक्क, विशेष अधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ति, जप्ती किंवा शिक्षा यांच्या संबंधातील कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

आणि जणू काही हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून, अशी कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना करण्याचा, चालू ठेवण्याचा किंवा तिची अंमलबजावणी करण्याचा व अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा करण्याचा अधिकार आहे :

परंतु आणखी असे की, मागील परंतुकास अधीन राहून, अशा कोणत्याही विधिअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा उपाययोजना (यात अशा रीतीने रद्द केलेल्या विधिंपैकी कोणत्याही विधिअन्वये केलेले नियम किंवा काढलेल्या कोणत्याही अधिसूचना, दिलेले आदेश, लायसन, पावत्या किंवा नोटिसा, केलेले अर्ज, दिलेली फी, निलंबित किंवा रद्द केलेली लायसन, केलेली अपिले आणि दिलेली प्रमाणपत्रे यांचाही समावेश होतो) ही जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींनुसार केलेली गोष्ट किंवा उपाययोजना आहे असे समजले पाहिजे आणि या अधिनियमानुसार केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा उपाययोजनाद्वारे ती रद्द करण्यात आली नसेल तर व रद्द करण्यात येईपर्यंत ती त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

समुद्र सीमाशुल्क अधिनियम, १८७८, इत्यादी खालील वखारींना अधिनियम लागू नसणे.

**४३.** समुद्र सीमाशुल्क अधिनियम, १८७८, केंद्रीय उत्पादशुल्क व मीठ अधिनियम, १९४४, किंवा अंतर्देशीय बॉन्डेड वखारींबाबत अधिनियम. १८९६ याअन्वये किंवा तत्सम अशा कोणत्याही कायद्याअन्वये नेमून दिलेल्या किंवा लायसन दिलेल्या किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांच्या मालकीच्या किंवा त्यांना नेमून दिलेल्या वखारीस या अधिनियमातील कोणतीही तरतूद लागू असणार नाही.

## अनुसूची

[ कलम २ (क) पहा. ]

एक. सूत.—

(१) कापसाचे (सरकी काढलेला व न काढलेला).

(२) कच्च्या तागाचे.

दोन. खाद्य तेले धरून खाद्यपदार्थ.

तीन. गळिताची धान्ये.

चार. तंबाखू.

पाच. गूळ.

सहा. वनस्पती तेले.

सात. पेंड व इतर सत्वयुक्त खुराक धरून वैरण.

आठ. बी-बियाणे.

नऊ. खते.

दहा. रासायनिक खते.

अकरा. शेतीची अवजारे.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.